# पिक संरक्षण व सर्वेक्षण केंद्र,

## Plant Protection and Surveillance Unit,

### किटकशास्त्र विभाग,

### Department of Entomology,

### डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विदयापीठ, अकोला-४४४ १०४

### Dr. Panjabrao Deshmukh Krishi Vidyapeeth, Akola-444 104

---

## पिक संरक्षण सल्ला (जून,२०१३)

१. पहिल्या पावसानंतर उगवलेले तण जांभूळ वाही देऊन नष्ट करावे तसेच बांधावरील पर्यायी खादय वनस्पती नष्ट करावी जेणे करून किडींची पहिली पिढी या वनस्पतीवर तयार होणार नाही.

२. घरचे सरळ वाणाचे बियाणे (उदा. सोयाबीन, तुर, मुंग, उडिद, कापुस ई.) वापरावयाचे झाल्यास बियाण्यास चाळणी लाऊन किडक /अशक्त बियाणे वेगळे करून त्याची उगवण शक्ती तपासावी व त्यानुसार एकरी बियाणे वापरण्याचे प्रमाण ठरवावे.

३. पेरणी पूर्वी शिफारशी नुसार बियाण्याला बुरशिनाशके / किटकनाशके /जैवीक खते (रायझोबीयम /ॲझोटोबॅक्टर / पीएसबी ) ई. ची बिज प्रक्रीया करून बियाणे पेरावे.

४. सर्वसाधारण उपलब्धतेनुसार किड प्रतिकारक बियाण्याचा वापर करावा.

५. पिकाची पेरणी करतांना सर्वसाधारण पेरणीचे शिफारशीत अंतर वापरावे कारण पावसाचा खंड पडल्यास किडींच्या आक्रमणामुळे पिकाची हेक्टरी संख्या कमी होण्याची शक्यता असते.

६. कपाशीत चवळीचे आंतर पीक किंवा कपाशीत ज्वारीचे आंतर पीक घेतल्यास ज्वारीच्या ओळीत वेलवर्गीय चवळी पेरावी किंवा कपाशीच्या सभोवताल ३ ते ४ ओळीत चवळी पेरावी , चवळीवर कपाशीवरील किडींच्या नैसर्गिक शत्रू किटकांचे पोषण होईल व नंतर ते कपाशीवरील किडींवर जगतील

७. मृद परीक्षणाच्या आधारावर खतमात्रेचा अवलंब करून दोन ओळीतील व दोन झाडातील अंतर योग्य तेच ठेवावे आणि जास्तीचा नत्र खताचा वापर टाळावा जेणेकरून पिकाची अनावश्यक कायीक वाढ होणार नाही आणि पीक दाटणार नाही पर्यायाने अशा पीकावर किडही कमी प्रमाणात राहील.

८. बियाण्याची उगवण झाल्यावर पावसामधे खंड पडल्यास जमिनीला भेगा पडायला सुरुवात होते. त्यामुळे नुकतेच उगवलेल्या रोपांची मुळे / खोड उघडे पडतात. अशा परिस्थितीत रोपांना जमिनीत/ जमिनीवर आढळणा-या किडींचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असते. या किडींमधे सर्वसाधारण वाणी, खूरपडी (जमिनीवरचे नाकतोडे) ई.चा समावेश होतो. किडींचे प्रौढ व पिल्ले आपल्या जबडयाच्या सहाय्याने बियाण्याचे अंकूर, मुळे व जमिनीलगत रोपे कुरतडतात व अशी रोपे कोलमडतात. त्यामुळे एकरी झाड

संख्या कमी होऊन उत्पादनामधे घट येण्याची शक्यता असते. तरीशेतकरी बंधुनी हंगामाच्या संरूवातीला अशी परिस्थिती येउु नये म्हणुन शेतामधील काडीकच-याचे व नकुजलेल्या शेणखताचे ढिग, धु-यावरील गवताचा व ईतर वनस्पतींचा वेळीच बंदोबस्त करावा.शेताचे नियमित सर्वेक्षण करावे. वाणीचे समूह आढळल्यास केरोसीनच्या पाण्यामधे बुडवून नष्ट करावे. सर्वेक्षणाव्दारे या किडींचा प्रादुर्भाव आढळल्यास धु-यावरील गवतावर २ टक्के मिथील पॅराथियान भूकटी किंवा क्विनॉफॉस १.५ टक्के भूकटी २० किलो/हेक्टर धु-यावर धुरळावी. धुरळणी सकाळी / सायंकाळी वारा शांत असतांना करावी. बांधावर सर्वसाधारण १० ते १५ दिवस जणावरांना चरू देऊ नये. प्रादुर्भावग्रस्त भागात जमिनीत ओलावा असतांना रोपटयांच्या बाजूला १० टक्के फोरेट १० कि/हे या प्रमाणात जमिनीत मिसळावे.प्रादुर्भाव सर्वदूर शेतात पसरला असल्यास व लक्षणीय नुकसान होण्याची शक्यता असल्यास , फेनव्हलरेट २० टक्के प्रवाही ६ मिली किंवा क्विनॉलफॉस २५ टक्के प्रवाही २० मिली या किटकनाशकांची १० लिटर पाण्यात घेऊन फवारणी करावी.

शेतकरी बंधुनी उपरोक्त उपाययोजना केल्यास आपल्या येणा-या खरीप हंगामातील पिकांवर किडींचा प्रादुर्भाव कमी होण्यास बरीच मदत होईल.

विभाग प्रमुख
किटकशास्त्र विभाग,
डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला